नागपूर सुधार प्रन्यास
**नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवर बसलेल्या अतिक्रमणधारी झोपडपट्टीवासीयांना मालकी हक्काने पट्टेवाटप करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- नासुप्र-२०१५/प्र.क्र.५३/नवि-२६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑगस्ट, २०१९

**वाचा :-**

१) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचे पत्र क्र.अधी.अभि./५१९९, दिनांक १९/०८/२०१५, पत्र आणि पत्र क्र.अधी.अभि/३९५८ दि.२८/०७/२०१६,
२) कार्यकारी अभियंता (मुख्यालय), नागपूर सुधार प्रन्यास यांचे पत्र क्र.का.अ.(मु)/१०२२० दिनांक १५/०१/२०१६ व पत्र क्र.अधी.अभि./११२०७ दिनांक ०३/०१/२०१६
३) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
४) समक्रमांक दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ चा शासन निर्णय
५) समक्रमांक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ चा शासन निर्णय (शुध्दीपत्र).
६) समक्रमांक दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ चा शासन निर्णय (शुध्दीपत्र)

**शासन निर्णय :**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ०४ येथील निर्गमित शासन निर्णयातील “अटी व शर्ती” या भागात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. :-

अट क्र.०४ :-

“पट्टे वाटप करताना नागपूर सुधार प्रन्यासच्या ठराव क्र.११/११४८ (तहकुब) दिनांक १४/०७/२०१५ अनुसार शिघ्रसिध्द गणकानुसार (रेडीरेकनर) वाणिज्यिक प्रयोजनासाठी १०० टक्के व रहिवासी वापरासाठी ५० टक्के प्रमाणे अधिमूल्याची आकारणी करण्यात यावी.”

**याऐवजी**

“पट्टे वाटप करताना नागपूर सुधार प्रन्यासच्या ठराव क्र.११/११४८ (तहकुब) दिनांक १४/०७/२०१५ अनुसार शिघ्रसिध्द गणकानुसार (रेडीरेकनर) वाणिज्यिक प्रयोजनासाठी १०० टक्के व रहिवासी वापरासाठी **५०० चौ.फू. पेक्षा अधिक परंतु १००० चौ.फू. पर्यंत जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर मूल्य तक्त्यातील दरानुसार येणाऱ्या किंमतीच्या १० टक्के आणि १००० चौ.फू. पेक्षा अधिकच्या क्षेत्रासाठी अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर मूल्य तक्त्यातील दरानुसार येणाऱ्या किंमतीच्या २५ टक्के प्रमाणे अधिमूल्याची आकारणी करण्यात यावी.”**

**अशी वाचण्यात यावी.**

अट क्र.०५ :- (नव्याने समाविष्ट)

"अतिक्रमण करण्यात आलेल्या भूखंडाची कमाल १५०० चौ.फूट इतकी राहील."

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१७०६३८९०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shashikant Narhari Yoge

Digitally signed by Shashikant Narhari Yoge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=88b7261ec236df5e51055c4e56e97c2ea6823e6595d110ff293acdf173898c9d, cn=Shashikant Narhari Yoge
Date: 2019.08.14 18:58:19 +05'30'

**(शशिकांत योगे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
२) प्रधान सचिव (नवि-२) यांचे वि.का.अ.
३) उप सचिव (नवि-२६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवडनस्ती, कार्यासन नवि-२६.